दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ५ वे अंक –१९७ रविवार,दि.२३ मार्च २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-197 Sunday, Dt.23 March 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# महाराष्ट्राला बसणार अवकाळीचा तडाखा

## राज्यावर दुहेरी संकट, आयएमडीचा हायअलर्ट

राज्यातून थंडी गायब झाली आहे, उन्हाचा कडाका चांगलाच वाढला आहे. मात्र आता आयएमडीकडून राज्यातील अनेक जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अवकाळी पावसासोबत गारपिटीची देखील शक्यता वर्तवण्यात आली आहे.

राज्यातून थंडी गायब झाली आहे, उन्हाचा कडाका चांगलाच वाढला आहे. मात्र आता आयएमडीकडून राज्यातील अनेक जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अवकाळी पावसासोबत गारपिटीची देखील शक्यता वर्तवण्यात आली आहे.राज्यातून थंडी गायब झाली आहे, उन्हाचा कडाका चांगलाच वाढला आहे. मात्र आता आयएमडीकडून राज्यातील अनेक जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अवकाळी पावसासोबत गारपिटीची देखील शक्यता वर्तवण्यात आली आहे.

आयएमडीनं दिलेल्या माहितीनुसार राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळासह जोरदार पावसाची शक्यता



आहे, पावसासोबतच गारपिटीची देखील शक्यता आहे. पाऊस आणि गारपीट असं दुहेरी संकट राज्यावर असणार आहे.

आयएमडीच्या इशाऱ्यानुसार आज मुंबई शहर आणि उपनगरात सकाळपासूनच ढगाळ वातावरण आहे. तर राज्यात अवकाळीसह गारपिटीची शक्यता आहे. मुंबईत उष्ण व दमट हवामान वाढणार असून उर्वरित महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, येत्या काही दिवसांत मुंबईच्या हवामानात मोठा बदल अपेक्षित आहे. मुंबईसह कोकणात दमट आणि उष्ण हवामान राहणार आहे.कोकण आणि विदर्भात ढगाळ वातावरण राहणार असून, गारपिटीसह पावसाची शक्यता आहे. गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाची शक्यता आहे.


दक्षिण महाराष्ट्र आणि गोव्यासह कोकणात पावसासोबतच तापमानात देखील वाढ होणार आहे. तर उर्वरित महाराष्ट्रात मेघगर्जनेसह गारपिटीची शक्यता आहे, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.विशेषतः २३ मार्चनंतर अवकाळी पावसाचा प्रभाव वाढेल. रायगड, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि पश्चिम महाराष्ट्रातील भागांत पावसाचा अंदाज आहे.मराठवाड्यातही पाऊस पडू शकतो, असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

# केज शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण धारकांना नोटीस

## पंधरा दिवसात अतिक्रमण काढा अन्यथा पोलिस बंदोबस्तात होणार कारवाई

केज/प्रतिनिधी

केज शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण धारकांना प्रशासनाकडुन नोटीस देण्यात येत असुन पंधरादिवसात अतिक्रमण काढुन घ्यावे अन्यथा पोलिस बंदोबस्तामध्ये अतिक्रमण काढण्यात येईल अशी नोटीस देण्यात येत आहे त्यामुळे अतिक्रमण धारकांचे धाबे दणाणले असुन पुन्हा कुठे बस्तान थाटायचे याचा विचार करताना दिसत आहेत.यामुळे आता रस्ते मोकळा श्वास घेणार असुन पथरस्ता मोकळा होऊन वहातुक सुरळीत होणार आहे.सदरील नोटीसमध्ये असे म्हटले आहे की,राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी पिंपळा जंक्शन ते मांजरसुंभा कि.मी ५५/ ६१५ ते कि.मी१३७/३०० रस्त्याची मालकी हद्द रस्त्याच्या मध्यापासुन १५ मीटर अंतरापर्यंत दोन्ही बाजुस (एकुण ३० मीटर रुंदीची जागा) ही,मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम २० नुसार तसेच शासननिर्णय क्र.बीएचए ३७६५/ ११६३४८–सी (१) दिनांक १९.०४.१९६७ च्या अधि



सुचनेनुसार शासकीय जागा आहे.या मुळ रस्त्याच्या मध्यापासुन आपण १५मीटर(५०फुट) च्याआत शासकिय जागेत अनाधिकृत रित्या अतिक्रमण करुन मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम २१(१) चे उल्लंघन केले आहे.२) करिता आपणास मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम २३ नुसार सुचित करण्यात येते की,आपण अनाधिकृत अतिक्रमण, हे पत्र मिळाल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत काढुन घ्यावे व शासकिय जागा पुर्ववत करण्यात यावी.३) तर आपण वरिल (२) मध्ये उल्लेख केलेल्या मुदतीच्या आतअतिक्रमण काढले नाही तर मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम २३ (३) मध्ये दर्शविलेल्या तरतूदीप्रमाणे गुन्हादाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल व गरज पडल्यास पोलीसांच्या मदतीने आपल्या परवानगी शिवाय अतिक्रमण काढुन टाकण्यात येईल.

४) अतिक्रमण काढण्यासाठी,हटविण्या साठी खात्यास येणाऱ्या खर्चाची भरपाई,मुंबई महामार्ग अधिनियम १९५५ च्या कलम २५ नुसार आपल्याकडुन वसुल करण्यात येईल. अतिक्रमणात काढलेले साहित्य जप्त करण्यात येवुन खात्याने अतिक्रमण काढण्यायाठी केलेल्या खर्चाची आपणांकडुन वसुली झाल्याशिवाय परत करण्यात येणार नाही किंवा भरपाई देण्यास आपण नकार दिल्यास किंवा टाळाटाळ केल्यास २५ (४) नुसार, जप्त केलेल्या साहित्याचा लिलाव करुन खर्चाची भरपाई करण्यात येईल.५) खात्यामार्फत अतिक्रमण काढल्यामुळे होणाऱ्या नुकसानीस आपण स्वतः जबाबदार राहाल

# सामाजीक सलोखा राखण्यासाठी शांतता कमिटीची बैठक संपन्न



बीड ।प्रतिनिधी

आगामी काळातील सण उत्सव जसे की, गुढी पाडवा, छ. संभाजी महाराज बलीदान मास, रमजान ईद, श्रीराम नवमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अनुषंगाने दिनांक २२ मार्च २०२५ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय येथे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब यांच्या अध्यक्षतेखाली शांतता समितीची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस बीड शहर तसेच जिल्ह्यातील शांतता समितीचे सदस्य उपस्थीत होते.

बैठकीस उपस्थीत सदस्यांना सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देवीदास गात यांनी सोशल मिडीयावर सामाजीक सलोखा बिघडवणाऱ्या पोस्ट केल्यास त्याचा समाजावर तसेच कुटुंबावर कसा परीणाम होतो याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

सध्या युवकांतर्फे सोशल मिडीयाचा गैरवापर व अतिरेक होत असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे शांतता समितीच्या सदस्यांनी स्वतः समाजातील युवकांना अवगत करुन त्यातुन निर्माण होणाऱ्या समस्यांची जाणीव करुन द्यावी. आक्षेपार्ह व्हॉट्सअप स्टेटस, रिल्स, पोस्ट करणारे किंवा प्रसारीत करणारे तसेच सोशल मिडीयावर सामाजीक बिघडवणाऱ्या पोस्ट किंवा प्रक्षोभक वक्तव्य करणाऱ्या इसमांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल. कोणाचीही गय केली जाणार नाही. समाजातील जेष्ठ नागरीकांनी सामाजीक सलोखा राखण्यासाठी मार्गदर्शक होवुन शांतता राखण्यासाठी प्रयत्न करावे असे मत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी व्यक्त केले. यापुढे शांतता समितीची बैठक प्रत्येक महीन्याला आयोजित केली जाणार आहे. सदर शांतता समिती बैठकीस नागरीकांनी मांडलेल्या समस्यांचे निराकरण करण्याचा बीड पोलीस दलाकडून केला जाईल असा विश्वास शांतता समितीतील सदस्यांना दिला आहे.

तसेच शांतता समितीच्या बैठकीस उपस्थीत सदस्यांना संबोधीत करतांना पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब यांनी नजीकच्या काळात होळी सणा निमीत्त बीड जिल्ह्यात काही घटना घडल्या होत्या त्यावेळी

(उर्वरीत पान २ वर)

# मिनी अभयारण्यात पक्षांचा किलकिलाट

## एपीआय भालचंद्र तिडके यांनी मुक्रमाबाद ठाण्याचे रूपडे पालटले



मुक्रमाबाद /प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद पोलीस ठाणे परिसरात मुक्रमाबाद पोलीस ठाण्याचे ठाणे प्रमुख भालचंद्र तिडके यांनी केलेल्या मिनी अभयारण्यात पक्षाचा किलकिलाट ऐकावयास मिळत आहे. मुक्रमाबाद पोलीस ठाणे परिसरात मिनी अभयारण्य साकारले असून या मिनी अभयारण्यात आंबा, चिंच, पेरू, चिकू सह इतर निसर्गाशी सह आदी प्रकारची झाडे बोलताना दिसून येत आहेत. या सर्व झाडांना ठिंबकच्या साह्याने पाणी दिले जाते. त्यामुळे झाडांची निगराणी अगदी योग्य पद्धतीने झालेली आहे. याच झाडावर अनेक पक्षांनी देखील आपले घरटे तयार केलेले असल्याचे पहावयास मिळत आहे.

पोलीस ठाण्याच्या आवारात सिमेंट काँक्रीटनी सुरक्षा रस्ता, रस्त्याच्या दोन्ही बाजूनी जोपासलेल्या झाडांनी मोठ्या प्रमाणात उभारी

(उर्वरीत पान २ वर)

# कमिशनरसाहेब, टीपीमधील नॉन टेक्नीकल स्टाफ माती खातोय!

## नगर शहराची वाट लावणाऱ्या नगररचना विभागात वैभव जोशी, संजय चव्हाण यांना कोण अन कशासाठी पोसतेय । आ. संग्राम जगताप यांनी लक्ष घालण्याची गरज

'टीपी'ची भाड खाणारी 'टोपी'/ पूर्वार्ध

। प्रशांत बाफना

शहर कोणतेही असो! त्या शहराच्या सुनियोजित विकासात महत्वाची भूमिका असते ती नगररचना विभागाची! या विभागाने माती खायला सुरुवात केली की त्या शहराचे मोठं खेडं कसं तयार होते याचे मुतमंत उदाहरण द्यायचे असेल तर अहिल्यानगर शहर! नगर शहरातील हजारो लेआऊट मधील ओपनस्पेस गायब झालेत. त्यात मोठा वाटा याच नगररचना विभागाचा! त्यातही या विभागात कार्यरत असणाऱ्या नॉन टेक्नीकल स्टाफचा! खरे तर या विभागातील टेक्नीकल स्टाफ हा पूर्णतः राज्य सरकारचाच असतो. नगरच्या महापालिकेत त्याला छेद देण्यात आलाय. वैभव जोशी हे त्याचे एक उदाहरण! ते महापालिकेचे कर्मचारी! त्यांची नियुक्ती नगर रचनाकार म्हणून कशी करण्यात आली याच्या खोलात जाण्याचे धाडस आयुक्त यशवंत डांगे हे करणार आहेत का? बल्लाळ नावाच्या कर्मचाऱ्याने महापालिकेची वाट लावली. त्यानंतर संजय चव्हाण नगर शहराची वाट लावण्याची सुपारी घेऊन काम करत आहे. गेल्या दहा– पंधरा वर्षांपासून नगर रचना विभागात कार्यरत असणारा संजय चव्हाण हा आयुक्तांचा जावई झाला असल्याची चर्चा आहे. आयुक्तांनी या चव्हाणची बदली करण्याचे धाडस दाखवावे! ते तसे करणार नाहीत अशी चर्चा झडतेय! या चर्चेला छेद देण्याचे काम झाले तर आणि तरच आयुक्तांबद्दल नगर रचना विभागातील टक्केवारीचा आरोप धुतला जाणार आहे. प्रशासक आणि आयुक्त अशा दुहेरी भूमिकेत संपूर्ण कंट्रोल यशवंत डांगे यांच्या हाती जसा आहे तसाच तो आमदार संग्राम जगताप यांच्याही हाती आहे. महापालिकेतील नगररचना विभागातील टक्केवारी अन कमीशनखोरीची कल्पना आ. जगताप यांना नसेल असे गृहीत धरले तर आता त्यांनी यात लक्ष घालण्याची गरज आहे.

आयुक्त साहेब, पेंडन्सीची सर्वाधिक मोठी दुकानदारी तुमच्याच कर्मचाऱ्यांची!

महापालिकेच्या नगर रचना विभागात पेंडींग फाईल्सची संख्या मोठी असल्याची ओरड अत्यंत सोयीस्करपणे कोणी पसरवली? त्यात तथ्य किती याच्या खोलात जाऊन आम्ही माहिती मिळवली असता धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. नगररचना विभागाच्या वेबसाईटवर घेतलेल्या माहितीनुसार या विभागाकडे २१७ प्रकरणे पेंडींग असल्याचे दिसते. त्यानुसार दस्तुरखुद्द आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे ९, सहसंचालक नगर रचना यांच्याकडे २, एटीपी श्री. शेळके यांच्याकडे १४, एटीपी श्री. जाधव यांच्याकडे २० अशी मिळून ४५ फाईल्स पेंडींग आहेत. नगर रचनाकार यांच्याकडे ३४ फाईल्स आणि आयुक्तांची खप्पा मज असणाऱ्या संजय चव्हाण आणि त्यांच्या नॉन टेक्नीकल टोळीकडे १३८ फाईल्स पेंडींग आहेत. आयुक्त साहेब, संजय चव्हाण व अन्य नॉन टेक्नीकल स्टाफ तुमच्या अखत्यारीत आणि तुमच्या खास मजतील असल्याचे बोलले जाते. त्यांना आवर कोणी घालायचा?

टक्केवारील शितयुद्धात नगरकर होरपळले जातात!

आयुक्त साहेब तुमच्यात आणि नगररचना विभाग यांच्यात शीतयुद्ध चालू असल्याची चर्चा आहे. खरे खोटे तुम्हाला माहिती! मात्र,

(उर्वरीत पान २ वर)

# महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष बीड जिल्हा दौऱ्यावर

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथासचिव ड. धर्मपाल मेश्राम हे उद्या २३ मार्च रोजी एक दिवसाच्या बीड जिल्हा दौऱ्यावर आहेत. उद्या दिनांक २३ मार्च २०२५ रोजी चा त्यांचा कार्यक्रम खालील प्रमाणे सकाळी ८.०० वाजता बीड विश्रामगृहावरून शिरूर कासार कडे भेटीसाठी प्रयाण. शिरूर कासार येथील आदिवासी पारधी समाजाच्या वस्तीवर वनविभागाच्या अधिकाऱ्यामार्फत झालेल्या जाळपोळीच्या अनुषंगाने घटनास्थळाची भेट आणि पहाणी व पारधी समाजातर्फे देण्यात आलेल्या निवेदनावर चर्चा.

शिरूर कासार येथून हे आष्टी तालुक्यातील जामगाव येथे घटनास्थळाची भेट व पाहणी करून आष्टी येथील विश्रामगृहावर येणार आहेत.आष्टी येथील विश्रामगृहावर अधिकाऱ्यांशी या सर्व घटनेबाबत चर्चा व आढावा बैठक. ही बैठक झाल्यानंतर ते याच ठिकाणी पत्रकारांशी संवाद साधणार आहेत.

# तर बीडचे मणिपूर होईल खा.रजनीताई पाटील यांचा सरकारवर हल्लाबोल

केज/प्रतिनिधी

राज्यसभेत काँग्रेस नेत्या खा.सौ.रजनीताई पाटील यांनी बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येवरून राज्य आणि केंद्र सरकारवर हल्लाबोल केला.त्यांनी काश्मीर मधील स्थिती विषयी आणि गृह मंत्रालयाच्या असमाधानकारक कामगिरीवर देखील तीव्र शब्दात टीका केली व सरकारला धारेवर धरले.बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येने राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचेअपयश पुन्हा उघड झाले.वेळीच आरोपींवर कारवाई झाली नाही,तर बीड जिल्हा आणि महाराष्ट्राचे मणिपूर होण्यास वेळ लागणार नाही असे एका स्थानिक शेतकऱ्याने काँग्रेसच्या सद्भावना यात्रेच्या वेळी सांगितले असा अनुभव सांगताना काँग्रेस नेत्या खा.सौ.रजनीताई



पाटील यांनी शुक्रवारी केंद्र व राज्य सरकारवर हल्लाबोल केला.राज्य सभेत मराठीतून केलेल्या १० मिनिटांच्या भाषणात पाटील यांनी विविध मुद्द्यांवरून केंद्रावर टीकास्त्र सोडले.जम्मू आणि काश्मीर मधील परिस्थिती सामान्य होत असल्याचे केंद्र सरकार वारंवार सांगत आहे.मग काश्मीरमधील सुरक्षेसाठी यंदाच्या ४१ हजार कोटी रुपयांची

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# स्पर्धा लोकविश्वासाची!

छत्तीसगडच्या बिजापूर-कांकेरमधील दोन चकमकींमध्ये गुरुवारी ३० माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले. माओवादमुक्तीच्या दिशेने हे मोठे पाऊल आहे. यात जिल्हा राखीव पोलिस दलाचा एक जवान हुतात्मा झाला.

आपल्या देशातील माओवाद्यांविरुद्धची लढाई हा केवळ मैदानी संघर्ष कधीच नव्हता. तो सैद्धांतिक लढाही राहिला आहे आणि तो आता निर्णायक टप्प्यात पोहोचला आहे. छत्तीसगडच्या बिजापूर-कांकेरमधील दोन चकमकींमध्ये गुरुवारी ३० माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले. माओवादमुक्तीच्या दिशेने हे मोठे पाऊल आहे. यात जिल्हा राखीव पोलिस दलाचा एक जवान हुतात्मा झाला.

पुढील वर्षी ३१ मार्चपर्यंत देश माओवादमुक्त होईल, अशी ग्वाही केंद्रीय गृहमंत्र्यांनी दिली आहे. मात्र त्यात अनेक अडचणी आहेत. ग्रामीण नागरिकांच्या सहकार्यासाठी माओवादी आणि सुरक्षा दलांमध्ये कायम मोठी स्पर्धा असते. ही विश्वासाची चढाओढ आहे. भर जंगलात बंदुकांसह माओवादी टिपणाऱ्या पोलिसांना गावांमध्ये मात्र शस्त्रांविना मने जिंकावी लागतात. अनेक गावांचे पोषण माओवाद्यांच्या साहाय्याने चालते. अशा वेळच्या आकस्मिक हिंसाचारात जिवाची बाजी लावण्याची तयारी पोलिसांना ठेवावी लागते. अलीकडील काळात माओवाद्यांवरील सरशीमुळे पोलिसांचे बळ वाढले आहे. तरीही वर्षभराच्या मुदतीत माओवाद निखंदून काढणे तसे कठीण आहे.

माओवाद्यांच्या केंद्रीय समितीचे नेते आणि मार्गदर्शक अद्याप सक्रिय आहेत. माओवादी व्यूहरचनाकारांच्या मुसक्या आवळण्याचे काम पोलिसांना युक्तीनेच करावे लागेल. त्यांनी स्थानिक कार्यकर्त्यांची कोंडी केली आहे. अर्बन माओवाद्यांना वैचारिक शह देण्यासाठी डावपेच आखावे लागतील. आजवर न पोहचलेल्या दुर्गम क्षेत्रांत घुसून माओवाद्यांच्या नाकी नऊ आणण्यात पोलिस यशस्वी ठरले. तरीही यश मिळवून परतणाऱ्या जवानांना काही महिन्यांपूर्वी दगाफटका झाला. छत्तीसगड आणि महाराष्ट्राच्या संयुक्त मोहिमा सुरू असतानाही घातपात संपलेले नाहीत. वर्षभराच्या मुदतीचा केंद्रीय दबाव माओवाद्यांपेक्षाही पोलिसांवर वाढला आहे.

विकासासोबत छुप्या आणि थेट आव्हानांचा मुकाबलाही महत्त्वाचा आहे. छत्तीसगडमध्ये सीआरपीएफचे तळ वाढले आहेत. सुकमा जिल्ह्यात पोलिसांचा दबदबा आहे. पुअरती हे माओवाद्यांच्या मोठ्या बटालिनचा कमांडर हिडमाचे गाव. तिथे पोलिस ठाणे झाले. त्या गावात मतदान झाले. वीज आली. मोबाइलचा टॉवर पोहोचला. दोन्ही स्तरांवर 'घुसून मारण्याची' ही तल्लख योजना आहे. छत्तीसगडमधील या भागात किरण चव्हाण हे मूळ कोल्हापूरकर अतिरिक्त पोलिस अधीक्षक आहेत. त्यांनी उत्तम काम केले आहे. महाराष्ट्राच्या सीमेलगत दामरंचा, ताडगाव, भैरमगडला स्थापलेल्या पोलिस ठाण्यांनी वचक निर्माण झाला आहे.

# लोक न्यायालयामध्ये तडजोडी अंती मयताचे वारसांना १ कोटी ८६ लाख रुपये नुकसान भरपाई मंजुर

बीड ।प्रतिनिधी

येथील जिल्हा न्यायालयात आयोजित लोकन्यायालयामध्ये तडजोडी अखेरीस दोन अपघात मृत्यूतील व्यक्तीच्या वारसांना वारसांना एक कोटी ८० लाख रुपये नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली सोबतच इतरही प्रकरणी समेट घडवून आणण्यात आला

आज दिनांक २२ मार्च २०२५ रोजी बीड जिल्हा न्यायालयामध्ये लोक न्यायालय संपन्न झाले. सदरील लोक न्यायालयामध्ये मोटार अपघात प्रकरण क्र. ४२६/२०२१ (शितल भगवान पवार व ईतर विरूद्ध शिवाजी व ईतर) या प्रकरणात मा. न्यायालयासमोर तडजोड झाली व सदरील तडजोडीनुसार अर्जदार यांना गैरअर्जदार क्र. ४ लिबर्टी जनरल इंन्शुरन्स कंपनी यांनी नुकसान भरपाईपोटी रक्कम रू.९०,००,०००/ (अक्षरी नव्वद लाख रूपये) मंजुर केले. सदरील प्रकरणात तडजोड करणेकामी अर्जदार १. शितल भगवान पवार, २. खुशी भगवान पवार, ३. सावित्रीबाई भागवत पवार ४. भागवत रामु पवार व उक्कडपिंप्रीचे सरपंच गहिनीनाथ पालवे व अर्जदारांचे वकील ॲड. एम. आर. गर्जे, गैरअर्जदार क्र. ४ तर्फे कंपनीचे वतीने त्यांचे अधिकारी श्रद्धा किनारे मॅडम, आदित्य रायकर व कंपनीचे विधीज्ञ ॲड. आनंद दिलीप कुलकर्णी, ॲड. ए. पी. कुलकर्णी यांनी मोलाचे सहकार्य केले. मयत भगवान भागवत पवार हे सैन्य दलामध्ये शासकीय नौकरीस असल्यामुळे गैरअर्जदार क्र. ४ यांनी सदर बाबीचा विचार करून सदरची नुकसान भरपाईची रक्कम मंजुर केली.



तसेच आज रोजीच्या न्यायालयामध्ये मोटार अपघात प्रकरण क्र. २४६/२०२२ (अर्चना धोंडरे व ईतर विरूद्ध मिर्झा बेग व ईतर) या प्रकरणात मा. न्यायालयासमोर तडजोड झाली व सदरील तडजोडीनुसार अर्जदार यांना गैरअर्जदार क्र. ४ रॉयल सुंदरम इंन्शुरन्स कंपनी यांनी नुकसान भरपाईपोटी रक्कम रू.९६,००,०००/(अक्षरी शहान्नव लाख रूपये) मंजुर केले. सदरील प्रकरणात तडजोड करणेकामी अर्जदारांचे वकील ॲड. सतीश गाडे व गैरअर्जदार क्र. ४ तर्फे कंपनीचे वतीने कंपनीचे विधीज्ञ ॲड. ए. पी. कुलकर्णी यांनी सहकार्य केले. मयत दिनेश प्रल्हादराव धोंडरे हे शासकीय नोकरीस असल्यामुळे गैरअर्जदार क्र. ४ यांनी सदर बाबीचा विचार करून सदरची नुकसान भरपाईची रक्कम मंजुर केली.सदरील वरील दोन्ही प्रकरणातील तडजोड जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री यावलकर अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश पाटवदकर, जिल्हा विधी प्राधिकरण, बीड चे सचिव सोनी यांचे समक्ष करण्यात आली.

पुन्हा जुळल्या नात्यांच्या तारा

अनिल कुंडलीक गालफाडे व गिरीजा उर्फ पौर्णिमा अनिल गालफाडे यांचा विवाह दि. ३१ मे २००१ रोजी चिंमोली माळी, ता.केज, जि. बीड हिंदु धर्म शास्त्राप्रमाणे झाला. लग्नानंतर काही दिवस त्यांचा संसार चांगला झाला. परंतु त्यानंतर त्यांच्यामध्ये वैयक्तीक मतभेद असल्याने किरकोळ कारणांवरून कारणावरून आपसामध्ये भांडण होवू लागले. गिरीजा ही अनिल याला सोडून माहेरी निघुन गेली. त्यांच्यातील आपसातील मतभेद वाढल्यामुळे त्यांनी घटस्फोटासाठी हिंदु विवाह अर्ज क्र. १९४/२०२३ हा या न्यायालयामध्ये अर्ज दाखल केला. प्रस्तुत प्रकरणातील कथने विचारात घेवून तडजोडीकरीता आज दि. २२/मार्च २०२५ रोजी लोकन्यायालयात ठेवण्यात आले. लोकन्यायालयामध्ये पॅनल प्रमुख दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अंबाजोगाई माणिक वाघ यांनी व पॅनल सदस्य म्हणून विधिज्ञ बाळासाहेब लाड यांनी काम पाहिले. अर्जदारातर्फे विधिज्ञ विषाल घोबाळे व हनुमंत राउत यांनी काम पाहिले.

दोन्ही पक्षकारांना आपली बाजु मांडण्यास संधी देवून दोघांचेही म्हणणे ऐकुन घेतले त्यांच्यातील वाद विकोपाला गेले असलेने त्यांना विवाहाचे महत्व समजावुन सांगितले. अनिल हा बिग बास्केट कंपनीमध्ये नोकरीस आहे. तसेच गिरीजा हिचे तंत्रशिक्षण झालेले आहे. त्यांच्या भविष्याकरिता त्यांनी एकत्र राहणे किती महत्वाचे आहे हे त्यांना समजावून सांगितले. दोन्ही पक्षकारांना सामाजिक भान लक्षात ठेवून संसार करण्यासाठी मार्गदर्शन केले. लोकअदालत पॅनल प्रमुखांनी केलेले मार्गदर्शन त्यांनी मनःपुर्वक ऐकुन घेतले व विवाह संबंध सुधारण्यास त्यांनी चांगला प्रतिसाद दिला व त्यांनी एकमेकांसोबत राहुन सुखाचा संसार करण्याचे ठरविले.प्रस्तुत प्रकरणात जिल्हा न्यायाधीश, अंबाजोगाई दिपक खोचे व संजश्री घरत यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर परेश वागडोळे यांचे अमुल्य सहकार्य लाभले. त्यांचे विधीज्ञ आणि वकील संघाचे सदस्य यांनीही पक्षकारांमध्ये तडजोड घडवून आणण्यास सहकार्य केले. उपस्थीत न्यायाधीश व वकील यांनी त्यांना पुढील सुखी संसाराच्या शुभेच्छा दिल्या.सर्वांच्या प्रयत्नाने व पक्षकारांच्या सहमतीमुळे एक मोडकळीस निघालेला संसार पुन्हा सुरळीत झाला.

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा गुंडगिरी करणाऱ्याला दणका !

## परळी भागात गुंडगिरी करणाऱ्या धोकादायक गुंडाची एमपीडीए कायद्याअंतर्गत हर्सूल कारागृहात रवानगी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हयातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत.त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची खंबीर साथ लाभली आहे.

बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व वाळु माफीयाचे समूळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून एमपीडीए कायद्या अंतर्गत ब-याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे त्या अनुषधांने पोनि पो.स्टे. परळी ग्रामीण यांनी दिनांक ०४.०३.२०२५ रोजी इसम नामे मोहन दौलत मुंडे रा. क्रांतीनगर, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड याचे विरुद्ध एमपीडीए कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसमाविरुध्द पो. ठा. परळी ग्रामीण येथेदिवसा व रात्री घरफोडी करणे, खंडणी मागणे, मारहाण करणे, शिवीगाळ करणे, जिवे मारण्याच्या धमक्या देणे, या व अशा गंभीर स्वरुपाचे एकुण ०७ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदरील इसम हा गंभीर स्वरुपाचे गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने परळी व अंबाजोगाई पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासुन करडी नजर होती, तसेच सदर इसमाने आपले वर्तन सुधारावे म्हणून यापुर्वी उीझउ ११० प्रमाणे दि.२६.११.२०२२ रोजी त्याचेवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा चढत्या क्रमाने गंभीर गुन्हे करण्याचे चालुच ठेवून होता त्याची अंबाजोगाई व परळी भागात प्रचंड दहशत आहे, त्यांचे विरुध्द सर्व सामान्य लोक फिर्याद अथवा साक्ष देण्यास समोर येत नाहीत, तो सर्वसामान्य लोकांना व व्यापाऱ्यांना त्रास देवून दहशत निर्माण करुन गुन्हे करत होता.

सदर प्रकरणात श्री. अविनाश पाठक जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी बीड यांनी दिनांक १८.०३.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधीत राहावी हा उदात्त दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्सूल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सूचना पोनि परळी ग्रामीण व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि. स्थागुशा श्री उस्मान शेख यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत सदर इसमास दिनांक २१.०३.२०२५ रोजी बीड शहरात ताब्यात घेऊन पो.स्टे. परळी ग्रामीण येथे हजर केले आहे. पो.स्टे. परळी ग्रामीण येथे सदर इसमास कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन योग्य पोलीस बंदोबस्तात हसुंल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दि. २२.०३.२०२५ रोजी हजर करुन स्थानबध्द केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपोअ अंबाजोगाई श्रीमती चेतना तिडके, उपविपोअ अंबाजोगाई श्री. अनिल चोरमले यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. श्री उस्मान शेख स्थागुशा बीड, पोनि मझहर सय्यद, पोउपनि शेख, पवार, पोह सुनिल अन्नमवार पो.स्टे. परळी ग्रामीण यांचे सह पोउपनि श्री. सिध्देश्वर मुरकुटे, तुळशिराम जगताप, सपोउपनि अभिमन्यु औताडे, पोह युनुस बागवान, राहुल शिंदे, कैलास ठोंबरे, पोअं/ चंद्रसेन राऊत, बिबीषण चव्हाण नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे समाजकंठक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहादर धोकादायक गुंडावर जास्तीत जास्त


# सावता नगर सिध्देश्वर मंदिरात शिवपुराण

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचा भाविकांनी लाभ घ्यावा!

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई शहरातील सावता नगर भागात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री. सिद्धेश्वराच्या कृपेने व गुरुवर्य परमपूज्य दिलीप बाबा उर्फ मसाननाथ महाराज घुगे श्री भगवान चिंतेश्वर मंदिर ,गेवराई यांच्या कृपा आशीर्वादाने श्री शिव महापुराण कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

येथील तरुण बांधवांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सिद्धेश्वर संस्थान सावता नगर गेवराई येथे सातत्याने धार्मिक अध्यात्मिक सांप्रदाय सेवेतून वेगवेगळे उत्सव समितीच्या वतीने करण्यात येतात यात श्री .राम कथा ,भागवत कथा किर्तन महोत्सव अखंड हरिनाम सप्ताह गेल्या बारा वर्षापासून अखंडितपणे आहे यावर्षी श्री. शिवमहापुराण कथा प्रवक्ते श्री . श्री ह. भ. प. श्रीहरी महाराज रसाळ, व व



ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व सत्यनारायण महाराज लगड यांच्या संकल्पनेतून संपन्न होणार आहे

तसेच दैनंदिन कार्यक्रम पारायणाची वेळ सकाळी साडेसात व शिवपुराण कथेची वेळ संध्याकाळी सात असुन२४ मार्च सोमवार रोजी आरंभ होणार असून ३१ मार्च रोजी यांच्या ह.भ.प.श्रीहरी महाराज रसाळ यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होईल. नंतर महाप्रसाद वाटप होईल. परिसरातील भाविकांनी याचा लाभ घ्यावा.

# पिंपळनेर पोलीस स्टेशनचा पदभार परिवीक्षाधीन

## पोलीस उपअधीक्षक श्रीमती पुजा पवार यांच्याकडे तर सपोनि मधुसुदन घुगे नियंत्रण कक्षात !

बीड ।प्रतिनिधी

परिवीक्षाधीन पोलीस उपअधिकक्षक म्हणुन श्रीमती पुजा पवार ह्या दिनांक ०१/०२/२०२५ रोजी बीड जिल्हयात हजर झाल्या आहेत. पोलीस दलातील प्रत्यक्ष कामाचे स्वरुप जाणुन घेण्यासाठी पोलीस उपअधीक्षक यांचा परिवीक्षाधीन कालावधीत पोलीस विभागातील पोलीस स्टेशन, शाखा, पोलीस मुख्यालय येथे कामकाज करण्याची संधी दिली जाते. परिवीक्षाधीन कार्यक्रमांतर्गत श्रीमती पुजा पवार यांना सुरुवातीचे ४ आठवडे पोलीस अधीक्षक कार्यालयातील विविध शाखा जसे की जिल्हा विशेष शाखा, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस उपअधीक्षक (गृह) यांचे कार्यालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालयातील दैनंदीन कामकाज अशा ठिकाणी त्यांना कामकाज देण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी १ आठवडा पोलीस मुख्यालयाच्या कामकाजाची माहीती घेतली. त्यानंतर त्यांनी २ आठवडे शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथील कामकाजाची माहीती घेतली. तसेच ग्रामीण पोलीस स्टेशनच्या कामाच्या अभ्यासासाठी त्यांची पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे नेमणूक करण्यात आली आहे.

दिनांक २४/०३/२०२५ ते १५/०६/२०२५ अशा १२ आठवड्यांच्या कालावधीसाठी त्यांची पिंपळनेर प्रभारी अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आली आहे. सदरच्या कालावधीत पिंपळनेर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे यांची तात्पुरत्या स्वरुपात नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. सदरचा प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसुदन घुगे यांची पुन्हा पिंपळनेर पोलीस स्टेशनला रुजु होणार आहेत.

## जी, मेनस्, एमएचटीसीईट आणि नीट या महत्वाच्या परीक्षा साठी युवासेना व वाकणकर सिनर्जी अकॅडमी तर्फे

# ऑनलाईन मॉक टेस्ट चे आयोजन विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा-युवासेना

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील युवकांच्या आणी युवतीच्या स्वप्नानां बळ देण्यासाठी युवासेना आणि वाकणकर सिनर्जी अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवसेना मुख्यनेते श्री एकनाथजी शिंदे साहेब व युवा खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, युवासेना कार्याध्यक्ष श्री पुर्वेश सरनाईक यांच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन मॉक टेस्ट २०२५ चे राज्यभरात आयोजन करण्यात आले आहे. या ऑनलाईन मॉक टेस्ट मध्ये बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा आणि Jee mains,mht cet, आणि neet या महत्वाच्या परीक्षांची तयारी आणखी मजबूत करून आपली स्वप्ने साकार करावीत असे आवाहन युवा सेना कार्यकारिणी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा संपूर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे व युवासेना बीड लोकसभा सागर बहीर, युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे ,युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजीत शिंदे यांनी आवाहन केले आहे. Jee mains,mht cet, आणि neet चे विद्यार्थी तरुण तरुणी ही मॉक टेस्ट घरबसल्या किंवा कुठल्याही ठिकाणावरून ही टेस्ट देऊ शकतात, तसेच कॉम्प्युटर, टॅब, अथवा मोबाईल याच्या माध्यमातून सुद्धा ही




मॉक टेस्ट देऊ शकता ती सुद्धा अगदी मोफत, या परीक्षेचे वेळापत्रक : २६ मार्च, बुधवार - JEE MAINS (Engineering) तसेच ६ एप्रिल, रविवार - MHT CET (Engineering/Pharmacy), तथा २० एप्रिल, रविवार रोजी - NEET (Medical) असे वेळापत्रक असणार असून ही ऑनलाईन मॉक टेस्ट संपूर्णपणे युवा सेना आणी सिनर्जी अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवसेना मुख्यनेते श्री एकनाथजी शिंदे साहेब व युवा खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, युवासेना कार्याध्यक्ष श्री पुर्वेश सरनाईक यांच्या माध्यमातुन मोफत असणार आहे आणी मोफत नोंदणीसाठी लिंक: https://shorturl.at/4lQQu वर जाऊन विद्यार्थ्यांने या ऑनलाईन मॉक टेस्ट मध्ये सहभागी व्हायचे आहे अशी माहिती युवा सेना कार्यकारिणी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा संपूर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे व युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर, युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे, युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजित शिंदे यांनी दिली असून, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी यांनी या ऑनलाईन मॉक टेस्ट मध्ये सहभाग नोंदवावा व आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी एक पाऊल पुढे टाकावे असे आवाहन युवासेना कार्यकारिणी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे व बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर, युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे,युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजित शिंदे यांनी केले आहे.

पान १ वरून..

**सामाजीक सलोखा..**

नागरीकांनी अतिशय सामंजस्याची भुमीका घेवुन सामाजीक शांतता राखण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल बीड जिल्ह्यातील नागरीकांचे आभार मानले.

सदर शांतता समितीच्या बैठकीस पोलीस अधीक्षक नवनीत काँवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब, जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक मुकुद कुलकर्णी, सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देविदास गात, पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज, शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, बीड शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड व बीड शहर व जिल्ह्यातील शांतता समितीचे सदस्य हजर होते.

**कमिशनरसाहेब, ....**

त्यात सामान्य नगरकरांचे मोठ्या प्रमाणात हाल होतात. तुमच्या अथवा सह संचालक नगर रचना विभाग यांच्या सहीचा कागद हातात घेण्यासाठी आणि त्या कागदाची प्रिंट घेण्यासाठी संबंधीत क्लार्क पाच हजार रुपये घेत असल्याची चर्चा आहे. हे थांबावे असे कोणालाच का वाटत नाही! टक्केवारी नक्की कोण घेतेय याचा शोध कोणी घ्यायचा हाही प्रश्न आहेच!

पाच टेबलवर मोजावे लागतात प्रत्येकी १५ ते वीस हजार!

बिल्डर अथवा खासगी बांधकाम मंजूरी आणि पूर्णत्वाचा दाखला घेण्यासाठी नगरच्या महापालिकेत फाईल दाखल करुन घेण्यापासून ते आयुक्तांची सही होऊन माघारी येण्यापर्यंत पाच टेबलवर ती फाईल फिरते. त्या प्रत्येक टेबलवर किमान १५ ते २० हजार रुपये मोजावे लागत असल्याची चर्चा आहे. आयुक्त साहेब, एका फाईलवर सही होण्यासाठी ज्यांचा फक्त तपासण्यापूरताच संबंध आहे, अशा पाच टेबलवर जर वीस हजार रुपये एक टेबल प्रमाणे एक लाख मोजावे लागत असतील तर दिवसभरातील एकूण फाईल्सची संख्या पाहिल्यास येथील दिवसभराचे कलेक्शन किमान ४० ते ५० लाख रुपयांचे होतेय! डोळे फाटतील अशी माया या विभागातील कर्मचाऱ्यांनी मिळवलीय! त्यांची चौकशी करण्याचे धाडस कोणी करणार आहे का? त्याहीपेक्षा या कर्मचाऱ्यांची बदली करण्याचे धाडस आयुक्तांकडून होईल का हा खरा प्रश्न आहे.

**मिनी अभयारण्यात...**

पान १ वरून..

घेतलेली असल्यामुळे ठाण्याचा देखील चेहरा मोहरा बदलला आहे. ठाण्यात कामानिमित्त येणारी नागरिक देखील विश्रांतीसाठी या मिनी अभयारण्यात फेरफटका मारून थोडा वेळ का होईना सिमेंट कॉंक्रीटच्या खुर्च्यावर विश्रांती घेतात. मुक्रमाबाद पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष एपीआय भालचंद्र तिडके यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने तयार केलेल्या मिनी अभयारण्याचा ठाण्यात आलेल्या नागरिकांना विश्रांतीसाठी तर वाहनधारकांना वाहन सावलीला लावण्यासाठी देखील वापर होत आहे. मुक्रमाबाद पोलीस ठाण्याचे प्रमुख एपीआय भालचंद्र तिडके यांनी मुक्रमाबाद पोलीस ठाण्याचा कारभार हाती घेतल्यापासून पोलीस ठाण्याचा चेहरा मोहरा बदलून टाकला आहे.

**तर बीडचे मणिपूर...**

मोठी तरतूद का करावी लागली ? मोदी सरकारने काश्मिरी पंडितांचा वापर केवळ राजकीय शस्त्र म्हणून केला आहे.त्यांना मदत न करता त्यांच्यावर चित्रपट बनवण्याचे आणि त्याबद्दल फक्त बोलण्याचे काम त्यांनी केले आहे असे टीकास्त्र खा.सौ. रजनीताई पाटील यांनी सोडले.

सन २०२५-२६ च्या अर्थ संकल्पात गृह मंत्रालया साठी २ लाख ३३ हजार २११ कोटींची तरतूद करून ही या मंत्रालयाची कामगिरी असमाधान कारक आहे.निमलष्करी दलांत मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे आत्महत्या, मानसिक ताण,सेवा निवृत्ती आधीच राजीनामा देण्याचे प्रमाण वाढत आहे.सीआरपीएफ मध्ये नऊ टक्के कमी मनुष्य बळ आहे.या दलांच्या आधुनिकीकरणासाठी ४,०६९ कोटींची तरतूद केली आहे.परंतु गेल्या काही वर्षांत ९० टक्के अनुदान वाटप झालेले नाही.नारी शक्ती वंदन चा गवगवा करणाऱ्या या सरकारच्या काळात निम लष्करी दलांमध्ये महिला कर्मचा-यांचे प्रमाण फक्त चार टक्के आहे असे खा. रजनीताई पाटील म्हणाल्या.कॉंग्रेस कडून पाटील यांना २० मिनिटांचा वेळ बोलण्या साठी देण्यात आला होता मात्र आधीच्या वक्त्यांचे भाषण लांबल्याने पाटील यांना फक्त सात ते आठ मिनिटे मिळाली.भाषण घाईघाईने वाचताना खा.रजनीताई पाटील यांना खोकल्याची जबरदस्त उबळ आली.ते पाहून ज्येष्ठ सदस्या सुधा मूर्ती या भाजपच्या बाका वरून पुढे आल्या आणि त्यांना पाण्याची बाटली दिली.घरी जाताना पाटील यांनी आभार मानल्यावर मूर्ती यांनी,पक्षाचा इथे काय संबंध? अडचणीत आपणच मदत करायची असते असे सांगितले.



# अनिलदादा जगताप फाउंडेशनकडून मंजेरी हवेली शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या वाटप!

बीड /प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या समाज कार्याला प्रभावित होऊन बीडमधील असंख्य तरुणांनी एकत्रित येऊन समाजसेवेचे कार्य करण्यासाठी अनिलदादा जगताप फाउंडेशनची स्थापना केली. या फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात दिला जातो. याबरोबरच समाजपयोगी उपक्रम राबविले जातात. अनिलदादा जगताप फाउंडेशनचे सचिव आकाश भैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पाली सर्कलमधील जिल्हा परिषद शाळा (मंजेरी हवेली) येथील विद्यार्थ्यांना दि. २१ मार्च २०२५ रोजी अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या वतीने वह्या वाटप करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तथा पालकांच्या उपस्थितीमध्ये अनिलदादा जगताप फाउंडेशनचे कार्यवाहक प्रतिक कांबळे यांनी या वह्या वाटप केल्या. जिल्हा परिषद शाळा मंजेरी हवेलीचे मुख्याध्यापक सय्यद सर आणि उपस्थित पालकांनी यांनी अनिलदादा जगताप फाउंडेशनचे आभार व्यक्त करत फाउंडेशनच्या समाजसेवेच्या कार्याचे कौतुक केले आणि अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नांदेवाली ता.शिरूर कासार येथे मच्छिंद्रगडाचा नारळी सप्ताह ची तयारी सुरु आहे

## मच्छिंद्रगडाचा ४७ वा नारळी सप्ताह नांदेवाली येथे भव्य स्वरूपात साजरा होणार; तयारीला वेग

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील ब्रम्हलीन संत निगमानंद महाराज यांच्या जन्मभूमी असलेल्या नांदेवाली गावात यंदा मच्छिंद्रगडाचा ४७ वा नारळी सप्ताह मोठ्या उत्साहात आणि भव्य प्रमाणात साजरा होणार आहे. मच्छिंद्रगडचे मठाधिपती महंत जनार्दन महाराज मच्छिंद्रगडकर यांच्या मार्गदर्शनाखाली २ एप्रिलपासून सप्ताहाला सुरुवात होणार असून त्याच्या तयारीला जोरदार वेग आला आहे. नांदेवाली गावासह संपूर्ण परिसरात या सप्ताहाच्या निमित्ताने उत्साहाचे वातावरण आहे.

सप्ताहासाठी नांदेवाली गावाच्या मुख्य चौकाच्या पूर्वेला किर्तन मंडप,भोजन मंडप;किचन मंडप, किचन शेड मंडप ,राहुटी मंडप, देवघर मंडप, नामजप मंडप ,मुख्य मंडपकथा-कीर्तन स्टेज यासह आसा भव्य मंडप डेकोरेशन आसे एकूण ९८ हजार चौरस फूट मंडप उभारणीचे काम वेगाने सुरू आहे.भाविकांना बसण्यासाठी आणि कार्यक्रमांचा आनंद घेण्यासाठी पुरेशी व्यवस्था करण्यात येत असून मंडपाची सजावट आकर्षक पद्धतीने केली जात आहे. परिसराची स्वच्छता मोहीम हाती घेऊन स्वच्छतागृहे आणि पिण्याच्या पाण्याचीही सोय करण्यात येत आहे. विशेषतः कचरा व्यवस्थापनावरही भर देण्यात आला आहे.

सुरक्षा व्यवस्थेसाठी पोलिसांसह स्थानिक स्वयंसेवकांची विशेष टीम तैनात केली जाणार आहे. परिसरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे देखरेख ठेवली जाणार असून भाविकांच्या सुरक्षेचा प्राधान्याने विचार केला जात आहे.

सप्ताहादरम्यान धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार असून नामवंत कीर्तनकार आणि प्रवचनकार आपल्या विचारांचे सादरीकरण



करतील. स्थानिक गुनवान गायक वादक यांचे गायन करण्याची संधी मिळणार आहे.

सप्ताहासाठी येणाऱ्या भाविकांसाठी २४ तास अखंड भोजन व्यवस्था करण्यात येणार आहे. या व्यवस्थेवर स्थानिक पातळीवरील संयोजक बारकाईने लक्ष ठेवणार आहेत. यासाठी विशेष स्वयंसेवक समितीही गठित करण्यात आली आहे.या सप्ताहाच्या तयारीत स्थानिक ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने सहभागी झाले असून प्रत्येक जण आपापल्या परीने योगदान देत आहे. महंत जनार्दन महाराज मच्छिंद्रगडकर यांच्या नेतृत्वाखाली हा सप्ताह भक्तिमय आणि यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त होत आहे.मच्छिंद्रगडाचा नारळी सप्ताह हा केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक एकतेचे प्रतीक मानला जातो. दरवर्षी हजारो भाविक या सप्ताहात सहभागी होण्यासाठी दूरदूरवरून येतात. या सोहळयामुळे गावाचे वातावरण भक्तिमय होऊन सामाजिक ऐक्याचे दर्शन घडते.

मच्छिंद्रगडाचे संस्थापक आध्यक्ष ब्रम्हलीन संत निगमानंद महाराज यांच्या जन्मभुमी आसलेल्या नांदेवाली येथे मच्छिंद्रगडाचा फिरता नारळी सप्ताह होत आहे .त्या साठी ग्रामस्थांकडून तयारीला ऊस्पुर्त प्रतिसाद मिळत असून सप्ताह भव्यदिव्य स्वरूपात होणार आहे.

स्वामी जनार्दन महाराज
मठाधिपती
मच्छिंद्रगड ता.शिरूर कासार



## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणीला उस्फूर्त प्रतिसाद

बीड ।प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित सदस्य नोंदणीचा कार्यक्रम बीड शहराच्या नवी भाजी मंडई येथे शनिवारी संपन्न झाला. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, प्रांताध्यक्ष सुनील तटकरे, महिला प्रदेशाध्यक्ष रूपालीताई चाकणकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश आबा चव्हाण,

बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर, महिला राष्ट्रवादी पक्षाच्या बीड जिल्हाध्यक्षा प्रज्ञाताई खोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहराच्या नवीन भाजी मंडई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नोंदणी शिबिर घेण्यात आले. मागील आठ दिवसापासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्याध्यक्षा शालिनीताई परदेशी व महिला पदाधिकाऱ्यांसह घरोघरी जाऊन पक्ष नोंदणी करीत आहेत. आजपर्यंत महिलांनी जवळपास दोन हजारहून अधिक महिलांची सदस्य नोंदणी करण्यात आली. बीड मतदारसंघातून महिलांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा सदस्य होण्यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मोठ्या प्रमाणावर महिलांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नोंदणी केली आहे. आजच्या शिबिराला उपस्थित बीड जिल्हाध्यक्ष प्रज्ञाताई खोसरे, जिल्हा कार्याध्यक्ष शालिनीताई परदेशी, जिल्हा सरचिटणीस कोमल राजपूत, तालुका सचिव नीता कांबळे, शहर सचिव योजना स्वामी, आरती पिल्ले यांच्यासह मोठ्या प्रमाणात महिला पदाधिकारी, सदस्य उपस्थित होत्या. जिल्हा कार्याध्यक्षा शालिनीताई परदेशी यांनी उपस्थितांचे स्वागत केले तसेच जिल्हा सरचिटणीस कोमल राजपूत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# झिरपी जि.प.के.प्रा.शाळेत जल्लोषात वार्षिक स्नेहसंमेलन साजरे

अंबड ।प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलाविष्कारासाठी जि.प.के.प्राथमिक शाळा झिरपी येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विचारमंचाचे उद्घाटन पोउपनि. आदिनाथ ढाकणे यांच्या हस्ते पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री डॉ.प्रा.नारायण पालेकर कार्यक्रमाची सुरुवात गणपती बाप्पाच्या गीतावर नृत्य करुन विद्यार्थ्यांनी सामाजिक, अंधश्रद्धा, पर्यावरणावर आधारित नाटीका, गौळणी, भारुड, पोवाडा,लावणी, विविध मराठी हिंदी गाण्यावरती नृत्य सादरीकरण करुन श्रोत्यांची मने जिंकली. विद्यार्थ्याच्या अंगी असलेल्या सुप्त शक्तीचा विकास व्हावा, विद्यार्थ्यांना कलेची आवड निर्माण व्हावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून दरवर्षी अशा कार्यक्रमाचे आयोजन केले जाते जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे नाविन्यपूर्ण उपक्रमांची कस धरली आहे.त्याचाच एक भाग म्हणून वार्षिक स्नेहसंमेलनाचे जल्लोष मोठ्या उत्साहात साजरा झाले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोउपनि आदिनाथ ढाकणे अंबड, नितीन पगारे सर प्रशासकीय अधिकारी ओमशांती शिक्षण संस्था, प्राचार्य डॉ प्रकाश गाडेकर सर




ओमशांती बी.एड.कॉलेज अंबड,डॉ.लक्ष्मण सावंत अध्यक्ष रोटरी क्लब अंबड तथा संचालक पार्थ क्लिनिक, शिनगारे सर शिक्षणविस्तार अधिकारी अंबड, खिल्लारे तलाठी झिरपी, सुंदरराव राऊत केंद्रप्रमुख झिरपी, सतिष भापकर ग्रामविकास अधिकारी झिरपी, डॉ.रोहीत भाला अंबड, डॉ.अभय जाधव सेवा हॉस्पिटल अंबड, गणेश वराडे सरपंच बनटाकळी, अशोक जाधव सरपंच वसंतनगर,संदीप भवर सरपंच झिरपी, सुदर्शन जाधव उपसरपंच झिरपी, सतिष फोके चेअरमन,विठ्ठल चव्हाण शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष, आकाश जळके भारतीय लोकशाही न्युज,शेख फारुक दैनिक समर्थ राजयोग, गणेश जाधव दैनिक सुर्योदय,सय्यद नाजीम आदर्श जालना,तरंग कांबळे लोकात्मा न्युज,श्रीधर कापसे एस.के.न्युज,मंगेश कारके, अरविंद शिरगुळे,जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा झिरपी च्या वतीने सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य शाळेचे मुख्याध्यापक आश्रुबा गवई, शाळेतील सर्व शिक्षक या संमेलनात मुलाचा कसा राहील यासाठी शिक्षकांनी प्रयत्न केले या संमेलनाला विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर पंचक्रोशीतील ग्रामस्थ, उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक आश्रुबा गवई, सुत्रसंचलन शिवाजी धुपे यांनी केले. तर आभार यादवकुमार ठोके यांनी मानले.

# महावितरणला सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनीचा पुरस्कार

मुंबई ।प्रतिनिधी

महावितरणला शनिवारी नवी दिल्ली येथे केंद्रीय सिंचन व ऊर्जा मंडळातर्फे (सीबीआयपी) सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी वीज वितरण कंपनी म्हणून गौरविण्यात आले.अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी महावितरणचे कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर उपस्थित होते.महावितरणच्या गौरवाबद्दल अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे आभार मानले तसेच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.महावितरण मुंबईचा काही भाग वगळता संपूर्ण राज्याला वीज पुरवठा करते. महावितरणचे घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक आणि कृषी असे ३ कोटी ११ लाख ग्राहक आहेत. महावितरण देशातील सर्वात मोठी वीज वितरण कंपनी आहे.

महावितरणने ग्राहक सेवेसाठी तसेच वीज वितरणासाठी माहिती तंत्रज्ञानाचा केलेला वापर, ऊर्जा परिवर्तन आराखडा राबवून नवीकरणीय ऊर्जेच्या वापरावर दिलेला भर, वीज खरेदी खर्चात कपात करून ग्राहकांसाठीचा वीजदर कमी करण्यासाठी आयोगासमोर मांडलेला प्रस्ताव, शेतकऱ्यांना सिंचनासाठी सौर ऊर्जा मिळण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० सह राबविलेल्या विविध योजना आदी बाबींचा विचार करून महावितरणला सर्वोत्कृष्ट कामगिरीच्या पुरस्कारासाठी निवडण्यात आले.

वीज उपकेंद्रांची संख्या वाढविणे, त्यांची क्षमता वाढविणे, नव्या वीज वाहिन्यांचे जाळे उभारणे, वितरण रोहित्रांची उभारणी तसेच वीज वितरण व्यवस्थेत केलेली सुधारणा यांचाही विचार




महावितरणचा सन्मान करताना करण्यात आला.कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राबविण्यात येणारी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही गेम चेंजर योजना आहे. हा देशातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची अनेक दशकांची कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठ्याची मागणी पूर्ण होणार आहे. योजनेची अंमलबजावणी वेगाने सुरू आहे. आगामी वर्षामध्ये राज्यातील सर्व कृषी पंपांना शंभर टक्के सौर ऊर्जेचा पुरवठा करण्याचे उद्दीष्ट पूर्ण होईल. या योजनेत किफायतशीर दरात वीज उपलब्ध होत आहे. त्यामुळे महावितरणचा वीज खरेदी खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेच्या माध्यमातून सौर कृषी पंप बसविण्यात महावितरणने देशात प्रथम स्थान मिळविले आहे. उपसा सिंचन योजना सौर ऊर्जेवर चालविण्यासाठीच्या राज्य सरकारच्या योजनेसाठी महावितरणला नोडल एजन्सी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.गावाची संपूर्ण विजेची गरज स्थानिक पातळीवर तयार झालेल्या सौर ऊर्जेवर भागवून गावाला ऊर्जा स्वयंपूर्ण करण्यासाठी महावितरणने सौर ग्राम योजना सुरू केली आहे. त्यामुळे गावकरी वीजबिलमुक्तही होतात. राज्यात १०० गावे महावितरणतर्फे सौर ग्राम विकसित करण्यात येणार असून त्यापैकी १० गावे सौर ग्राम झाली आहेत. महावितरणने स्वतःची कार्यालये, वीज उपकेंद्रे, ग्राहक सेवा केंद्रे आणि अतिथी गृहे सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. महावितरणच्या मुख्यालयाच्या छतावर बसविलेल्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाचे नुकतेच उद्घाटन झाले.महावितरणने राज्यात विद्युत वाहनांसाठी ६३ चार्जिंग स्टेशन्स राज्यात उभारली आहेत. पुणे येथे उभारलेल्या विद्युत वाहनांचे चार्जिंग स्टेशन छतावरील सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पाला जोडून महावितरणने अक्षय्य ऊर्जेच्या आधारे वाहनांचे चार्जिंग करण्यासाठी पाऊल टाकले आहे.

## मृदा व जलसंधारण विभागाच्या गाळमुक्त धरण गाळमुक्त शिवार या ऑनलाइन पोर्टलचे मंत्री संजय राठोड यांनी केले उद्घाटन

यवतमाळ ।प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे जागतिक जल दिनाचे औचित्य साधून मृद व जलसंधारण विभागाच्या गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार या महत्त्वाकांक्षी योजनेच्या प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी मृद व जलसंधारण विभाग तसेच भारतीय जैन संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या ु.ाहिळुररी.ले या ऑनलाईन पोर्टलचे उद्घाटन केले.

राज्याचे मुख्यमंत्री मा. ना.देवेंद्रजी फडणवीस,उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पाणीदार महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मृद व जलसंधारण विभागाने उचलले आहे.

राज्याचा मृद व जलसंधारण विभाग आणि महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्था,ग्रामपंचायती संयुक्तपणे यासाठी काम



करणार असून या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील धरणांमधून गाळ काढून तो शेतीच्या पुनर्वापरासाठी उपलब्ध करून दिला जाणार आहे. यामुळे धरणांची पाणी साठवण क्षमता वाढेल आणि शेतकऱ्यांना अधिक सुपीक माती मिळेल.परिणामी, ही योजना शेतकऱ्यांसाठी क्रांतिकारी ठरणार आहे.

या उद्घाटनप्रसंगी मृद व जलसंधारण विभागाचे सचिव श्री. गणेश पाटील, यवतमाळ जिल्हाधिकारी श्री. विकास मीना, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मंदार पत्की, भारतीय जैन संघटनेचे संस्थापक श्री. शांतीलाल मुथ्था, भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. नंदकिशोर साखला तसेच राज्यातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आणि मृद व जलसंधारण विभागाचे सर्व अधिकारी तथा जिल्हा व तालुका स्तरावरील सर्व प्रशासकीय अधिकारी,भारतीय जैन संघटनेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

## चिंच फोडुन बेरोजगारीवर मात करत अबालवृद्ध महिलां शोधत आहेत रोजगार – डॉ गणेश ढवळे लिंबागणेशकर

लिंबागणेश

बीड तालुक्यातील लिंबागणेश परीसरात चिंच झोडणीचे काम जोरदार सुरू असुन चिंच फोडणीच्या कामामुळे ग्रामीण भागातील महिला मजुरांच्या हाताला काम मिळत आहे.चिंच फोडणीसाठी १२ रूपये किलो दर मिळत असुन एक महिला दिवसातुन २५ ते ३० किलो चिंच फोडणी करत असल्याने ३५० रुपयांपर्यंत रोजंदारी पडत असल्याचे वाघमारे यांनी सांगितले. शेतमजुर, महिला वर्ग आर्थिक संकटात असताना अशावेळी चिंच फोडणी कामाने महिलांच्या हाताला काम मिळाल्याने बेरोजगारीचा प्रश्न काही प्रमाणात मिटला आहे.चिंचा झोडण्याचे काम जिकिरीचे पण पुर्ण कुटुंबिला रोजगार - अजय



थोरात

चिंचा झोडण्याचे काम फेब्रुवारी मध्ये सुरू होऊन मे महिन्यांपर्यंत संपते. या ४ महिन्यात ग्रामीण भागात यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते.झाडावर चढुन बांबुने झोडपुन चिंचा खाली पाडणे, पडलेल्या चिंचा वेचणे, त्यांच्यावरील टरफल बाजुला करणे,चिंचा फोडुन गर व चिंचोके वेगळे करणे आदी कामे कुटुंबातील महिला व मुले करतात. झाडांच्या फांदीवरून धोकादायक पद्धतीने झोडपणी करावी लागते.गेल्या १५ वर्षांपासून आम्ही भावंडे चिंचा झोडण्याचा व्यवसाय करत असल्याचे लिंबागणेश येथील अजय परमेश्वर थोरात यांनी सांगितले.

यावर्षी बाजारभाव चांगले परंतु आवक कमी - चंद्रकांत आवसरे

गेल्या वर्षीच्या मानाने यावर्षी चिंचाला बाजारभाव चांगला मिळत असुन नगर येथील व्यापारी जागेवर येऊन माल घेऊन जातात.फोडलेल्या चिंचेला प्रतिकिलो ११ रूपये बाजारभाव मिळतोय. यावर्षी चिंचेच्या झाडांना चिंचेचे प्रमाण कमी असल्याने यावर्षी आवक कमी प्रमाणात असल्याचे लिंबागणेश येथील चिंचेचे व्यापारी चंद्रकांत आवसरे यांनी सांगितले.

# चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रह म्हणजे मानवी हक्काची लढाई होती – अँड. सिद्धार्थ शिंदे

बीड ।प्रतिनिधी

उच्च शिक्षण घेऊन विद्या विभूषित होऊन आपले संपूर्ण आयुष्यभर दीन दलित वंचित बहुजनांच्या व देशाच्या हिताकरता झटलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक लढा मानव विकास करता व स्वाभिमानाची लढाई होती. त्यापैकी त्या काळात नैसर्गिक संपत्ती पासून देखील दीनदलित अस्पृश्य समाजाला सार्वजनिक मालकीच्या पाण्याला देखील स्पर्श करू देत नव्हते, त्याकरता डॉ. बाबासाहेबांनी फुले, शाहूंच्या विचाराने प्रेरित झालेल्या त्या काळातील उच्चवर्णी यांच्या बहुमोल सहकार्यांनी महाड येथील चवदार तळ्याच्या पाण्याकरता २० मार्च १९२७ रोजी सत्याग्रह केला होता. तो चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रह मानवी हक्काची लढाई होती. त्या लढाईची स्मृति प्रेरणादायी आहे असे उद्गार अध्यक्षपदी लाभलेले अँड. सिद्धार्थ शिंदे यांनी काढले.

महामानव सार्वजनिक वाचनालय धानोरा रोड बीड येथे महाडच्या सत्याग्रह संग्राम दिन म्हणून संपन्न करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले. तसेच थोर इतिहासकार व बहुजनांच्या हिताकरता व त्यांना अंधश्रद्धा अनिष्ट रुडी परंपरा पासून दूर राहण्याकरता प्रखर लेखन करणारे थोर वक्ते प्राध्यापक मा.म. देशमुख




यांच्या दुःखद निधनादिनी त्यांच्या प्रतिमेस पुष्प, पुष्पमाला अर्पण करून भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाकरिता वंचित बहुजन आघाडीचे गेवराई तालुका महासचिव किशोर भोले, सैनिक दलाच्या वंदना वाघमारे प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. विचार मंचावर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले प्रा. अशोक गायकवाड, सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक यू.एस. वाघमारे, यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचाल तर वाचालचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे यांनी तर सूत्रसंचालन डी.एम. राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पुढे म्हणाले की सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीच्या यशाकरता एका विशिष्ट समुदायाचा लढा न उभारतात सर्व समावेशक समाज हिताकरता सर्वांनी सहभाग नोंदवून जसा चवदार तळ्याच्या सत्याग्रहांमध्ये डॉ. बाबासाहेबांच्या मानवी हक्क च्या लढाई करता सुरभा नाना टिपणीस, गंगाधर सहस्त्रबुद्धे, अनंत चित्रे, शेख बांधव ज्यांनी सत्याग्रहाच्या मंडपाकरता जमीन दिली होती. असे शेख बांधव यांनी बहुमोल सहकार्य करून तत्कालीन हक्क व कर्तव्याची पूर्णपणे जाणीव ठेवून लढा दिला तर यश नक्की मिळते हे महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रह दीपस्तंभ प्रमाणे प्रेरणादायी आहे त्या काळातील अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे किशोर भोले वंदनाताई वाघमारे, सुजाता वासनिक यांनी महाडच्या सत्याग्रहाबद्दल व थोडी इतिहासकार मा.म. देशमुख यांच्या जीवन कार्याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे कार्यक्रमा अर्जुन जवंजाळ, एस.एस. सोनवणे,सुधाकर विद्याधर, विद्याधर नाणी, बि.डी. तांगडे, व महामानव अभिवादन ग्रुपचे बहुसंख्य सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार के.एस.वाघमारे यांनी व्यक्त करून सरणातयेने कार्यक्रमाची सांगता झाली.

## विमलताई जगताप यांचे दुःखद निधन

बीड ।प्रतिनिधी

पालसिंगण येथील प्रतिष्ठित नागरिक हरिश्चंद्र जगताप पाटील यांच्या सुविद्य पत्नी आणि श्री.छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळाचे संचालक प्रा. शिवाजीराव जगताप पाटील यांच्या भावजयी व श्री.रंजित हरिश्चंद्र जगताप यांच्या मातोश्री विमलताई जगताप यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी अल्पशा आजाराने जगदाळे मामा हॉस्पिटल बार्शी येथे गुरुवारी दुपारी ११.५० वाजता दुःखद निधन झाले. अंत्यविधी पालसिंगण येथे सायं. ५.३० वाजता करण्यात आला.त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र शोक व्यक्त करण्यात येत आहे. त्यांचा स्वभाव अतिशय मनमिळाऊ आणि धार्मिक होता. श्री. छत्रपती शाहू समाज प्रबोधन मंडळ बीडच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.



दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजश्री
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



# वरीष्ठ व निवड श्रेणीचा लाभ हा शिक्षकांचा हक्क

## शिक्षणाधिकारी यांनी तातडीने न्याय द्यावा - जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी

बीड ।प्रतिनिधी

जिल्हा परिषद शिक्षकांना एकाच पदावर निश्चित केलेल्या अटी शर्ती व सलग बारा वर्षे सेवेनंतर चटोपाध्याय आयोगाने शिफारस केलेली वरीष्ठ वेतन श्रेणी व सलग चोवीस वर्षे सेवा केल्यानंतर निवड श्रेणी बहाल केली जात असते.जिल्हा परिषद बीड मधील शिक्षण विभागाने मागील पंचवीस ते तीस महिन्या पासून एकही शिक्षकास निवड श्रेणीचा तर पंधरा ते वीस महिन्या पासून वरीष्ठ श्रेणीचा लाभ दिलेला नाही.वास्तविक पाहता, वरीष्ठ व निवड



श्रेणीसाठी पात्र असणाऱ्या शिक्षक बांधवांना सदरील श्रेणीचा लाभ तातडीने मिळणे हा त्यांचा हक्क आहे. मात्र शिक्षण विभाग वरीष्ठ व निवड श्रेणीच्या प्रस्तावित केलेल्या पाच संचिका निकाली काढण्यात अद्याप यशस्वी झालेला नाही.

तेव्हा माननीय शिक्षणाधिकारी साहेबांनी खातेप्रमुख या नात्याने तातडीने सदरील संचिका निकाली काढव्यात, अशी मागणी प्रहार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना जिल्हा बीडचे जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी निवेदनाद्वारे केली आहे अशी माहिती जिल्हा सरचिटणीस अविनाश काळे यांनी दिली आहे.

# महाबोधी महाविहार आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी धर्माबाद तालुक्यातून शेकडो बौद्ध बांधव जाणार - गणेश वाघमारे

धर्माबाद ।प्रतिनिधी

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी मागील अनेक दिवसापासून भिकू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, समस्त आंबेडकरवादी पक्ष व संघटना यांच्या वतीने आंदोलन सुरू असून सदरील आंदोलनाला पाठिंबा म्हणून नांदेड येथे दिनांक २५ मार्च २०२५ रोजी मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामोर्चात धर्माबाद तालुक्यातील शेकडो बौद्ध अनुयायी उपस्थित राहतील अशी माहिती धर्माबाद येथील समता सैनिक दलाचे कमांडर गणेश वाघमारे यांनी दिली आहे. जगभरातील बौद्धांचे प्रमुख श्रद्धास्थान म्हणून बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे भारतातच नव्हे तर जगभरात



प्रसिद्ध आहे. तो इतरांच्या ताब्यात असून बुद्धगया टेम्पल क्ट १९४९ लागू असलेला कायदा त्वरित रद्द करून बौद्ध भिकू व बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी मागील काही दिवसापासून भिकू संघाच्या वतीने बुद्धगया येथे आंदोलन करण्यात येत आहे. सदरील आंदोलनाला भारतभरातून मोठा प्रतिसाद मिळत असून त्या अनुषंगाने धर्माबाद येथील शासकीय विश्रामगृहात ही बैठक घेण्यात आली असून नांदेड येथे आयोजित दिनांक २५ मार्च २०२५ रोजी काढण्यात येणाऱ्या महामोर्चामध्ये सहभागी होण्याबद्दल चर्चा करण्यात आली.

यावेळी इंजिनीयर भरत कानींदे, रोहिदास कांबळे, टी. पी. वाघमारे, वंचित बहुजन आघाडीचे धर्माबाद तालुकाध्यक्ष एकनाथ जिंकले, सचिव गौतम देवके, सल्लागार जे. के. जोंधळे,चांदु वाघमारे, शहराध्यक्ष रोहित रामटक्के, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संघटक सुभाष कांबळे, हिशोब तपासणी माधव शेळके यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# २४ मार्च सोमवाररोजी लक्ष्मण पवारांकडुन रोजाइफ्तारीचे आयोजन- याहिया खॉन

गेवराई ।प्रतिनिधी

मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरु असुन सालाबादा प्रमाणे याही वर्षी मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार व पवार परिवारांच्या वतिने रोजागार मुस्लिम बांधवासाठी सोमवार दि.२४ मार्च सोमवार रोजी नगर परिषद छत्रपती शिवाजी महाराज सभागृह छत्रपती शिवाजी महाराज चौक गेवराई येथे रोजा इफ्तारीचे आयोजन करण्यात आले आसल्याचे याहीया खॉन यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

रमजानच्या पाश्र्वभूमीवर रोजागार मुस्लिम बांधवासाठी विविध जातीधर्मातील नागरीक रोजाइफ्तारीचे आयोजन करण्याची परपंरा आहे परंपरेनुसार गेवराई शहरातील पवार कुटुंबाच्या दरवर्षी रोजाइफ्तार आयोजीत केला जात असून याही वर्षी दि.२४ मार्च सोमवार रोजी मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार व शिवराज बाळराजे पवार यांच्या वतिने रोजा इफ्तारचे आयोजन करण्यात आले आसल्यांचे याहिया खॉन यांनी म्हटले आहे.

# पाण्याच्या बचतीसाठी धोरणात्मक निर्णयांची गरज - प्रा. डॉ. संतोष रणखांब

परळी (प्रतिनिधी)

वर्तमान तसेच भविष्यातील गंभीर पाणी प्रश्न निर्माण होऊ नये तसेच मानवी दैनंदिन जीवनासाठी पाण्याच्या बचतीचे महत्व लक्षात घेऊन वैयक्तिक व शासकीय स्तरावर धोरणात्मक निर्णयाची गरज असल्याचे प्रतिपादन प्रा.डॉ. संतोष रणखांब यांनी केले. ते जागतिक जलदिना निमित्त परळी येथे व्याख्यान देतांना बोलत होते.

. परळी येथील वैद्यनाथ महाविद्यालयात जागतिक जलदिनानिमित्त सोनपेठ येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयाचे प्रा डॉ. संतोष रणखांब यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अर्चना चव्हाण या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य प्रा. डॉ.बी.के.आंधळे ,प्रा. व्ही.बी.गायकवाड, प्रा.पी. एल. कराड , प्रा. टी.ए.गिते तसेच कार्यालयीन अधीक्षक अशोक रोडे उपस्थित होते. यावेळी मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांनी पाण्याचे महत्व विशद करणारे भित्तिपत्रके तयार केली होती. त्याचे प्रकाशन करण्यात आले.

पुढे बोलताना प्राध्यापक डॉ .संतोष रणखांब म्हणाले की पाणी हेच मानवाचे जीवन आहे.आणि प्रत्येक मानवाला स्वच्छ पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे .परंतु जागतिक स्तरावर विचार केला तर पाण्याचे प्रदूषण प्रचंड प्रमाणात वाढले आहे. तापमानात वाढते कार्बन



डायऑक्साइड चे प्रमाण, वाढत्या औद्योगिकीकरणामुळे ग्लोबल वॉर्मिंगचा जगापुढे धोका निर्माण झाला आहे. यावर्षी युनोने जागतिक जल दिनानिमित्त हिमनद्या व त्यांचे संवर्धन या विषयावर सर्वत्र चर्चा व्हावी या उद्देशाने जगात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. तापमान वाढले आणि मोठ्या प्रमाणात हिमनद्या वितळल्या तर जगापुढे धोका निर्माण होऊ शकतो.

पाणी बचतीची सवय ही स्वतःपासून सुरू केली पाहिजे. समाजात पाण्याचा होणारा अपव्यय टाळण्यासाठी आवश्यकता नसतानाही गाडी धुणे, नळाला मोडक्या तुट्या असणे, पाणी भरणे झाल्यानंतरही नळाचे पाणी नाली मध्ये सोडून देणे त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाते हे प्रत्येकाला रोखता येऊ शकते. जुन्या काळी बारा महिने पाणी असणारे बारव आज एकतर कोरडे पडले आहेत किंवा त्याचा वापर कचराकुंडी म्हणून होताना दिसत आहे हे धोक्याची बाब आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभागाचे प्राध्यापक संजय रणखांबे यांनी केले सूत्रसंचालन प्रा.सोमनाथ किरवले यांनी तर आभार प्राध्यापक डॉ.रामेश्वर चाटे सर यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड मधील आत्महत्या ग्रस्त शिक्षक धनंजय नागरगोजे यांच्या कुटुंबियाला ॲड.माधव जाधव यांनी केली २५ हजार रुपयांची मदत

केज/प्रतिनिधी

देवगाव ता.केज जिल्हा बीड येथील रहिवासी असणारे शिक्षक धनंजय नागरगोजे यांनी नुकतीच काही दिवसापूर्वी बीड येथील बँकेच्या समोर गळफास घेऊन आत्महत्या केली.१८ वर्ष शिक्षकाची नोकरी मोफत केल्यानंतर सुद्धा त्यांना पगार चालू न झाल्यामुळे धनंजय नागरगोजे यांनी तीन वर्षाच्या लहान मुलीला उद्देशून फेसबुक वर पोस्ट टाकून स्वतःची जीवन यात्रा संपवली. मयत शिक्षक धनंजय नागरगोजे यांना तीन वर्षाची एक लहान मुलगी व त्याचप्रमाणे त्यांची पत्नी ही सहा महिन्याची गरोदर आहे.घरामध्ये वृद्ध आई-वडील आहेत.अशा परिस्थितीमध्ये धनंजय नागरगोजे यांनी अतिशय टोकाचे पाऊल उचलून आत्महत्या केली.त्यामुळे संपूर्ण कुटुंब दुःखामध्ये व संकटामध्ये



आहे.ड. माधव जाधव यांनी देवगाव ता.केज जिल्हा बीड येथे जाऊन मयत धनंजय नागरगोजे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन मयत धनंजय नागरगोजे यांचे वडील भानुदासराव नागरगोजे व भाऊ गणेश नागरगोजे यांच्याकडे जय भारती बहुउद्देशीय सेवाभावी प्रतिष्ठान मार्फत २५ हजाररुपयाचा धनादेश देऊन या कुटुंबाला आर्थिक मदत केली.यावेळी ड.माधव जाधव यांचे सोबत ड.रणजीत खोडसे,श्री. देविदास नागरगोजे, सुनील घोळवे,शरद मुंडे, अशोक नागरगोजे, सदाशिव मुंडे,ड.एस. एल.गलांडे ,ड.एस.व्ही. गलांडे,ड.एम.एल. भोसले,ड.पी.डी.इतापे, ड.काझी,सुग्रीव आप्पा अंबाड व ग्रामस्थ यावेळी उपस्थीत होते.

# आष्टीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते महेबुब शेख यांच्याकडून मुस्लिम बांधवांना इफ्तार पार्टी

आष्टी (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांच्या वतीने आष्टी तालुक्यातील मुस्लिम बांधवांसाठी शुक्रवार दि. २१ मार्च रोजी शहरातील ईदगाह मैदान येथे सायंकाळी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. सध्या मुस्लिम धर्मातील पवित्र रमजानचा महिना सुरू आहे. या महिन्यांच्या अखेरच्या टप्प्यात मुस्लिम बांधवांसाठी विविध राजकीय पक्षाकडून रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येते. अशातच आष्टी - पाटोदा - शिरूर विधानसभा मतदारसंघाचे नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांच्या वतीने देखील आष्टी तालुक्यातील व आष्टी, मुर्शदपुर शहर परिसरातील मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

प्रथम वर्ष असून महेबुब शेख यांच्याकडून मुस्लिम बांधवांसाठी



रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील रोजा इफ्तार पार्टीमध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य सतिश शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे तालुकाध्यक्ष परमेश्वर शेळके, आण्णासाहेब चौधरी, राम खाडे, डॉ. शिवाजी राऊत, सुनिल नाथ, संजय थोरवे, डॉ. नदीम शेख, ड. रिजवान शेख, जिशान सय्यद, दादासाहेब झांजे, जगन्नाथ ढोबळे, डॉ. विलास सोनवणे, डॉ. राज शेख, विजय गाढवे, आदर्श शिक्षक राजेंद्र लाड, शफी सय्यद, शेरूभाई शेख, माऊली मुटकुळे, सादीक कुरेशी, गणीभाई तांबोळी, अतुल शिंदे, शब्बीर शेख, मोसिम पठाण, सचिन गोंदकर, अशोक पोकळे, शिवाजी सुरवसे, ड. बी. सी. शेख, लईकशेठ काझी, मोहसिन कुरेशी, लहू भवर, राहुल काकडे, तोफीक शेख, रजी बेग, वसिम बारी, अन्वर अत्तार, मोहम्मद कुरेशी, निसार कुरेशी, गुलाम हाबीज साहेब, असद सय्यद, कलील शेख, जाकीर अत्तार, ड. वहिम शेख, हमीद बेग तसेच कार्यकर्ते, डॉक्टर, वकील, पत्रकार, सर्व क्षेत्रातील मान्यवर व हिंदू, मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परळीत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत विशेष तपासणी मोहिमेचे आयोजन

परळी (प्रतिनिधी)

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम हा ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी सर्वसमावेशक आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी भारत सरकारने सुरू केलेला एक आरोग्य कार्यक्रम आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातर्गत १ मार्च ते ३० मार्च २०२५ या दरम्यान विशेष आरोग्य तपासणी मोहीम सुरु आहे, या मोहिमेमध्ये अंगणवाडी व शाळेतील ते १८ वर्ष वयोगटातील बालकांची तपासणी करण्यात येते आहे. त्याअनुषगाने आपणास कळविण्यात येते कि, वैद्यकिय अधिक्षक व तालुका आरोग्य अधिकारी यांनी तालुका स्तरावर सदरच्या मोहिमेतर्गत ज्या शाळा व अंगणवाडीमध्ये बालकांची आरोग्य तपासणी होणार आहे.

२०२४-२५ वर्षाची शाळा कृती योजना (टीम-०२) शाळेचे नाव भेटीची तारीख, ०१ मार्च २०२५ , १२ कृष्णा नगर, ०३ मार्च २०२५, १४ कृष्णा नगर ०४ मार्च २०२५, ०५ मार्च २०२५, गावंडे गल्ली ३७ ०६ मार्च २०२५, होळकर गल्ली ३६ ०७ मार्च २०२५, ०८ मार्च २०२५,,

नांदुर्वेस ११ १० मार्च २०२५, नांदुर्वेस ११ मार्च २०२५, १२ मार्च २०२५, बागला ६२ १३ मार्च २०२५, १४ मार्च २०२५, १५ मार्च २०२५, , भीम नगर ५० १७ मार्च २०२५, भोई गल्ली ४० १८ मार्च २०२५, गंगासागर नगर ४१ १९ मार्च २०२५, २० मार्च २०२५, जि.प.शाळा पोलिस वसाहत २ परळी २१ मार्च २०२५, २२ मार्च २०२५, , जि.प. परडू शाळा बरकत नगर परळी २४ मार्च २०२५, नझझ च-ठ-ढक्ख डक-ङ- इ-ठघ-ढ छ-ऋ-ठ झ-ठङख त,२५ मार्च २०२५,जि.प. शाळा आझाद नगर परळी,२६ मार्च २०२५, २७ मार्च २०२५, नझझ मराठी शाळा आझाद नगर परळी २८ मार्च २०२५ , २९ मार्च २०२५, , ३१ मार्च २०२५ या ठिकाणी मोहिम राबविण्यात येणार आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य अंतर्गत राज्यातील ० ते १८ पळवर्षे वयोगटातील बालकांची होणार सर्वांगीण तपासणीचा लाभ घ्यावा असे आवाहन वैद्यकीय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय परळी वैजनाथ यांनी केले आहे.

# आष्टीच्या भगवान महाविद्यालयास मिळाले शासनाचे दोन पुरस्कार

आष्टी (प्रतिनिधी)

येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या भगवान महाविद्यालयास महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या 'करिअर कट्टा' या उपक्रमाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर विभागाचा बीड जिल्हा उत्कृष्ट महाविद्यालयाचा द्वितीय आणि बीड जिल्हा उत्कृष्ट समन्वयक प्रथम अशा दोन पुरस्काराने मंगळवार दिनांक १८ मार्च २०२५ रोजी देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ व महाविद्यालयाचे करिअर कट्टाचे समन्वयक प्रो. शिवाजी पवार यांना महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे, देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, छत्रपती संभाजीनगर उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. रणजीतसिंह निंबाळकर, प्राचार्य डॉ. संजय



खरात, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते या मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

महाविद्यालयामध्ये करिअ रकट्टा अंतर्गत घेतलेल्या विविध उपक्रमांची दखल घेऊन हे पुरस्कार देण्यात आलेले आहेत. या पुरस्काराबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, समन्वयक प्रो. शिवाजी पवार व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी माजी आमदार भीमराव धोंडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य व संस्थेचे सहसचिव डॉ. अजय दादा धोंडे, संस्थेचे सर्व प्रशासन अधिकारी व परिसरातील अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारकडून अनेक योजना राबविल्या जातात त्याचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा - आ.सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी)

शेतकऱ्यांनी केंद्र सरकार व राज्य सरकारच्या ज्या योजना असतील त्या राबवत त्याचबरोबर नवीन नवीन उद्योग उभा करावेत, शेतमाल तारण योजना करण्यासाठी गोडाऊन बांधावे असे प्रतिपादन आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे आ. सुरेश धस यांनी व्यक्त केले. महाकिसान संघ कृषी प्रोड्यूसर कंपनी मार्फत सांगवी पाटण येथे शासकीय हमीभाव तूर खरेदी केंद्राच्या शनिवार दि. २२ मार्च रोजी उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

ते बोलताना पुढे म्हणाले की सोयाबीनचा पेरा तालुक्यात हळूहळू वाढत चालला आहे. दौलवडगाव ते हातोला सोयाबीन कडे वळतोय. सोयाबीनचे उत्पादन वाढवणे आता गरजेचे झाले आहे तसेच शेतीवर आधारित उद्योग उभारणे ही आता काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले तर देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतील हमीभाव खरेदी केंद्रामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील तूर विक्रीसाठी तालुक्याच्या अथवा बाजार समितीच्या ठिकाणी नेण्याची गरज पडणार नाही. हमीभाव केंद्रावर खरेदी होत असल्याने चार दिवसांच्या आता थेट शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये डीबीटी पोर्टलद्वारे पैसे येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांची खरेदी विक्रीची प्रक्रिया अधिक सुलभ होईल. तसेच शेतकऱ्यांना व्यापाऱ्याला पैशासाठी वारंवार विनवण्या करण्याची गरज नाही. यामुळे शेतकरी सुखावणार असून निश्चितच सर्व शेतकरी बांधवांसाठी ही आनंदाची बाब आहे. यावेळी नवनाथ भगत यांचे कौतुक केले. फार मेहनती मुलगा आहे. त्यांच्या बरोबर सांगवी पाटण येथील



आदित्य अशोक खिलारे यांची इंडियन आर्मी मध्ये निवड झाली त्याबद्दल सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ह. भ. प. काशिनाथ महाराज शास्त्री, ह. भ. प. सुदर्शन मुनी महाराज शिंदे, ह. भ. प. अशोक महाराज भोसले, ह. भ. प. आप्पा महाराज भगत, शत्रुघ्न (बापू) मरकड, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, उद्धव पवार, रंगनाथ धोंडे, शिवाजी नाकाडे, एन. टी. गर्जे, नवनाथ तरटे, सरपंच दत्तात्रय खोटे, अशोक गर्जे, सरपंच मनोज गाढवे, ग्रामसेवक मुळीक, संजय पवार, धनंजय तरटे, नामदेव काकडे, सरपंच मोहन आमटे, शेषराव गर्जे फौजी, सुंदरलाल गर्जे, डॉ. राम तरटे, सरपंच अभय गर्जे, बाबासाहेब भोसले, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे मॅनेजर सचिन औटे, एच. डी. एफ. सी. बँकेचे मॅनेजर चौधरी, बद्रिनाथ तरटे, दत्तात्रय भोसले, जगन्नाथ खिलारे, आसराजी खिलारे, परसराम खिलारे, बबन जगताप, लक्ष्मण भोसले, बशीर शेख, सय्यद मिस्तरी, डॉ. पुरुषोत्तम बावदानकर, बाळासाहेब भवर, भाऊसाहेब भवर, निलेश पोकळे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख व पंचक्रोशीतील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).